आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक २४१ वा ● मंगळवार ३१ मार्च २०२६ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## ‘महावीर ज़यंती’निमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

मुंबई, दि. ३० : राज्यपाल जिष्णु देव वर्मा




यांनी महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महावीर जयंती, तीर्थंकर भगवान महावीरांचे जीवन कार्य तसेच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया व अनेकांतवादाच्या शिकवणीचे स्मरण करून देते. त्यांच्या आदर्श विचारांचा प्रभाव आजही भारतीय जनमानसावर दिसून येतो. भगवान महावीरांचे विचार आज सर्वाधिक प्रासंगिक आहेत. महावीर जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या चार विद्यार्थ्यांची पुण्यातील औषधनिर्माण कंपनीत निवड

लातूर: दयानंद शिक्षण संस्था संचलित



दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथील बी. फार्मसीच्या चार विद्यार्थिनींची दि. २७ मार्च २०२६ रोजी जेएसपीएम शिक्षण संस्था, लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या देवाभाऊ जॉब महाएक्स्पो – २०२६ या भरती प्रक्रियेमध्ये पुणे येथील नामांकित एजिओ फार्मास्युटिकल्स कंपनीमध्ये निवड झाली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमधून बी. फार्मसी चतुर्थ वर्षातील वैष्णवी जाधव, वैष्णवी पवार, संपदा चारथनकर व मानसी सगरे या विद्यार्थिनींची फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरिंग व गुणवत्ता नियंत्रण (टींरश्रळींू उेपींीश्र) या महत्त्वाच्या विभागांमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळणार आहे. या पदांसाठी त्यांना दरमहा सुमारे २०,००० रुपये वेतन मिळणार असल्याची माहिती या जॉब महाएक्स्पोमध्ये देण्यात आली.

या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरामणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापक व इतर कार्यालयीन कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्रशासकीय कामे गतीने पूर्ण करा - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

छत्रपती संभाजीनगर, (विमाका) ३०: विभागातील सर्व जिल्ह्यातील प्रलंबित प्रशासकीय कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.




विभागीय आयुक्त कार्यालयात श्री.पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली आज दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी, दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

विभागातील प्रत्येक जिल्ह्यांनी मतदार यांद्याचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची (ड्खठ) कार्यवाही जलद गतीने पूर्ण करावी. शासनामार्फत साधना सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या कालावधीत प्रत्येक विभागांनी आपल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या कर्मयोगी भारत संकेतस्थळावरील जास्तीत जास्त शासकीय कामकाजासाठी उपयुक्त असणारे अभ्यासक्रम पूर्ण करून घ्यावेत. जिल्हाधिकाऱ्यांनी जनगणनेच्या अनुषंगाने आवश्यक बाबी पूर्ण करून घ्याव्यात. विभागातील दुष्काळी परिस्थिती निवारण्यासाठी व टँकरमुक्तीसाठी जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यासाठी निवडलेल्या गावांची यादी पाठवावी जेणे करून सीएसआरच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे होण्याच्या दृष्टीने मनुष्यबळ उपलब्ध करून देता येईल. यासाठी सुरेश खानापूरे यांच्या व अनुलोम संस्था या सेवाभावी संस्थांचे सहकार्य या कामासाठी घेता येईल. जास्तीत जास्त पाणी अडवून जिरविण्यासाठी आवश्यक प्रकल्पांचे प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ती कार्यवाही करावी.

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेसंदर्भातील प्रलंबित कामे शासनाच्या नविन नियमानुसार पूर्ण करावीत. गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजनांची जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा. सिंचन विभागाने अधिग्रहीत केलेल्या जमिनींच्या नोंदी अद्ययावत करून शासनाकडे परत घेण्यासंदर्भात पाठपुरावा संबंधित विभागाने करावा, अशा सूचनाही श्री. पापळकर यांनी यावेळी केल्या.

# मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी ‘हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान’

मुंबई, दि. ३० : मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. एकीकडे झोपडपट्टी पुनर्विकासाला गती देत दुसरीकडे ‘नेत्रम’ तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या झोपड्या उभारल्या जाऊ नये याची पण काळजी घेतली जाणार आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हे महत्वाचे अभियान राबवून एकप्रकारे बाळासाहेबांना ही आदरांजलीच वाहिली आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.



राज्य शासनाच्या या निर्णयामुळे मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रक्रियेला मोठी चालना मिळणार असून, नागरिकांना अधिक सुसज्ज आणि सुरक्षित घरे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अभियानाच्या माध्यमातून बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नातील झोपडपट्टीमुक्त मुंबई साकार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

समूह पुनर्विकासाला गती

या अभियानात किमान ५० एकरपेक्षा जास्त क्षेत्र आणि ५१ टक्क्यांपेक्षा अधिक झोपडपट्टी क्षेत्र असलेल्या समूहांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रामुख्याने खासगी, सरकारी, निमसरकारी मोठ्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात ‘स्लम क्लस्टर रिडेव्हलपमेंट स्कीम’ राबविण्यात येईल. यासाठी झोपडपट्टी क्षेत्राची मोजणी करून बायोमेट्रिक सर्वेक्षण केले जाईल. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए, महाप्रित यांसारख्या संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

३०० चौ. फुटाच्या सदनिका

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पूर्वी लहान क्षेत्रफळाच्या सदनिकाधारकांना मोठ्या घरांचा लाभ देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी १८०, २२५ व २६९ चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येत होत्या. मात्र, आता प्रचलित धोरणानुसार ३०० चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्याचे निश्र्चित करण्यात आले आहे. यासाठी जुन्या प्रकल्पांचे उन्नतीकरण करून पुनर्विकास करण्यात येणार आहे.

नवीन झोपडपट्ट्या निर्माण होणार नाहीत

या महाअभियानात नेत्रम तंत्रज्ञानाचाही मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. ‘नेत्रम’द्वारे उपग्रह डेटा, जीआयएस प्रणाली आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन झोपडपट्ट्या निर्माण होऊ दिल्या जाणार नाहीत. उच्च दर्जाच्या उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने नव्याने उभारल्या जाणाऱ्या झोपड्यांचे निरीक्षण केले जाणार आहे.

या अनुषंगाने बिसाग–एन (बीआयएसएजी–एन) या संस्थेच्या वेब–पोर्टलद्वारे झोपडपट्ट्यांची अचूक माहिती मिळवून संबंधित यंत्रणांना पाठविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्वतंत्र अंमलबजावणी कक्ष स्थापन केला असून, बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांनाही स्वतंत्र यंत्रणा उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दर चार महिन्यांनी (वर्षातून तीन वेळा) उपग्रह प्रतिमा प्राप्त करून त्यांचे विश्र्लेषण करण्यात येणार असून, नव्याने निर्माण होणाऱ्या झोपड्यांवर तात्काळ कारवाई करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणांनी त्यांच्या मालकीच्या तसेच खासगी जमिनींवर प्रत्यक्ष पाहणी करून अनधिकृत झोपड्यांचे निष्कासन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

देखभाल शुल्कात सुधारणा

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये आता उंच इमारती बांधण्यात येणार असल्याने सध्याचे देखभाल शुल्क त्यामानाने अत्यल्प आहे. देखभाल शुल्कातही सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या प्रति सदनिकाधारक ४० हजार रुपये असलेले देखभाल शुल्क अपुरे ठरत असल्याने इमारतींच्या उंचीनुसार शुल्क निश्र्चित करण्यात येणार आहे. ७० मीटरपर्यंतच्या इमारतींसाठी १ लाख रुपये, ७० ते १२० मीटरपर्यंत २ लाख रुपये आणि १२० मीटरपेक्षा जास्त उंच इमारतींसाठी ३ लाख रुपये देखभाल शुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया झाली आहे

## औसा येथे भाजप कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ; लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ - आ. अभिमन्यू पवार

औसा : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून



राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचत असून त्यामुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे, असे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

ते औसा येथील केशव बालाजी मंदिर येथे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय कार्यकर्ता निवासी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. मंडळ प्रशिक्षण महाअभियानांतर्गत आयोजित या शिबिरात सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला.

आ अभिमन्यू पवार पुढे म्हणाले की, पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदयाच्या विचारसरणीवर आधारित योजनांमुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय लाभ पोहोचत आहे. जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला गॅस योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीकविमा योजना, आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजना यांसारख्या उपक्रमांमुळे जनतेच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यकर्ता हाच भारतीय जनता पक्षाचे खरे बलस्थान आहे. प्रशिक्षणाद्वारे कार्यकर्त्यांना अधिक सक्षम व अद्ययावत करण्याचा हा प्रयत्न असून त्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

दरम्यान, पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण वर्ग महाअभियान २०२६ अंतर्गत २८ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत औसा मतदारसंघातील औसा शहर, औसा ग्रामीण, किल्लारी व कासार सिरसी मंडळांसाठी प्रत्येकी ८ सत्रांचे दीड–दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत. याच पार्श्र्वभूमीवर औसा शहर मंडळ प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटनही करण्यात आले.

## डॉ. जयसिंगराव पवार हे खऱ्या इतिहासाचे पाईक होते लातुरात श्रद्धांजली सभेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दिला आठवणींना उजाळा

लातूर : ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे २६ मार्च रोजी कोल्हापूर येथे निधन झाले. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी लातूर येथील बाबासाहेब परांजपे फाउंडेशन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, राजर्षी शाहू प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या लातूर शाखेतर्फे बाबासाहेब परांजपे फाऊंडेशनच्या वाचनालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.



श्रद्धांजली सभेत बोलताना इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले की, इयत्ता चौथीच्या अभ्यासक्रमातील इतिहासाच्या पुस्तकाची पुनर्लेखन ही डॉ. जयसिंगराव पवार यांची अद्वितीय कामगिरी आहे. डॉ. पवार यांनी बऱ्या इतिहासाची वाट कधीही धरली नाही आणि ख–या इतिहासाची वाट कधीही सोडली नाही. खऱ्या इतिहासाचा धागा मजबूत करणे आणि इतिहासाचे खोटे भ्रम दूर करणे हे काम त्यांनी आयुष्यभर केले. बऱ्या इतिहासाचे पाईक होण्यापेक्षा खऱ्या इतिहासाचे पाईक होणे हीच डॉ. जयसिंगराव पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

डॉ. पवार यांनी बहूजन समाजातील संशोधकांना इतिहासाकडे वळवले..

ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार म्हणाले की, आदर्श प्राध्यापक, आदर्श संशोधक, आदर्श व्यक्ती कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. जयसिंगराव पवार हे होय. लोकशाहीचे बुरुज ढासळत आहेत. नागरिकांना जागे व्हा, असे विचार आपल्या लेखणीतून परखडपणे मांडून त्यांनी वैचारिक दूरदृष्टी सिद्ध केली आहे. बहूजन समाजातील प्रज्ञावंतांना, संशोधकांना इतिहासाकडे वळवले. पुरावा न देता निष्कर्ष काढू नये, ही शिस्त त्यांनी लावली. बहूजन समाजातील अभ्यासकांनी ज्ञान व्यवहाराकडे लक्ष देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

यावेळी डॉ.गणेश गोमारे, भाऊसाहेब उमाटे, प्रा.वैभव सरवदे, डॉ.जयद्रथ जाधव, डॉ.अशोक नारनवरे, डॉ.संजय वाघमारे, डॉ.सतिष यादव, कमलाकर मोटे, आप्पाराव शिंदे, धनंजय उजणकर, शिवाजीराव साखरे, डॉ.बी.आर.पाटील आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आदरांजलीच्या माध्यमातून डॉ. जयसिंगराव पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला.

श्रद्धांजली सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन इतिहास अभ्यासक डॉ. विवेक सौताडेकर यांनी केले. याप्रसंगी सूर्यकांत वैद्य, सौ. वैद्य मॅडम, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, नरसिंग इंगळे, डॉ. संजय जमदाडे, भीमराव दुनगावे, रामदास कांबळे, ड. शिंदे, पारससेठ चापसी आदींची उपस्थिती होती.

# जागतिकस्तरावर अस्थिरतेच्या काळात निसर्गोपचार आवश्यक - डॉ. धनलाल शेंद्रे

नागपूर, दि. ३० :आज जागतिकस्तरावर आपण अस्थिरतेचा अनुभव घेत आहोत. त्यामुळे वाढणारे ताण–तणाव अनेक आजारांना आमंत्रण देत आहेत. अशा काळात निसर्गोपचार आवश्यक असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा परिषद नवी दिल्लीचे महाराष्ट्र प्रभारी डॉ. धनलाल शेंद्रे यांनी केले. माहिती आणि जनसंपर्क संचालक कार्यालयातर्फे आयोजित विशेष उपक्रमात ते बोलत होते.



निसर्गोपचार ही फक्त एक चिकित्सा पद्धती नाही, तर ती जीवनपद्धती असल्याचे सांगून डॉ. शेंद्रे म्हणाले की, हवा, पाणी, जमीन असे सारेच आज दूषित झाले असल्याने आजारांचे प्रमाणही वाढले आहे. आपली आधुनिक जीवनशैली त्यासाठी पूरक ठरत आहे. निसर्गोपचार ही रोगमुक्त करणारी चिकित्सा पद्धत आहे. सर्व आजार एक व सर्व आजारांचे कारण एक, हे या पद्धतीचे सूत्र आहे. निसर्गोपचारात यज्ञ चिकित्साही केली जाते. काहींनी याला धार्मिक स्वरूप दिले मात्र ही चिकित्सा पद्धती आहे व अनेक मानसिक आजार, अनिद्रा, मेंदू विकार यावर यज्ञ चिकित्सा उपयोगी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जेवण झाल्यानंतर किमान तीन तास झोपू नका, रात्री हलका आहार घ्या, सकाळी नाश्ता म्हणून फळे खा, भोजनाच्या पाऊण तास आधी आणि भोजनानंतर एक तासाने पाणी प्या, आहारात भात, पोळी कमी आणि भाजी अधिक घ्या, झोपण्याच्या किमान दोन तास आधीच मोबाइलपासून दूर व्हा, अशा निरोगी आयुष्याच्या टिप्सही त्यांनी दिल्या. आजार होऊच नये यासाठी ही पद्धती आहे. त्यामुळे निसर्गोपचाराचा अवलंब केला, तर डॉक्टरांकडे जायची वेळ येणार नाही, असेही शेंद्रे यांनी सांगितले.

माणसाला आयुष्यात पद, पैसा प्रतिष्ठा मिळेल, पण त्याचबरोबर मन आणि शरीर सुदृढ असणे आवश्यक आहे. त्यासाठी निसर्गोपचार परिणामकारक असल्याचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी डॉ. मुळे यांनी डॉ. शेंद्रे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन सहायक संचालक पल्लवी धारव यांनी केले.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## १२ व १३ एप्रिलला सहाव्या राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे आयोजन : डॉ. अभिमन्यू टकले

लातूर : प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दि. ११ व



१२ एप्रिल २०२६ रोजी नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे सहाव्या राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. अभिमन्यू टकले यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत दिली. होळकर वाडा या ठिकाणी होणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षपदी सोलापूरच्या पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची निवड करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या साहित्य संमेलनाचे कार्यवाहक प्राचार्य दत्तात्रय बारगळ हे आहेत. संयोजक बापूसाहेब शिंदे हे असून सदर संमेलन मार्गदर्शक व महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब कर्णवर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. संमेलनाचे उदघाटन आ. गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार आहे. ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होणार आहे. शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खा. रामराव वडकुते, मध्यप्रदेशचे पालकमंत्री सैतान सिंग, माजी आमदार रामहरी रुपनवर, काळाराम मंदिराचे मुख्य पुजारी सुधीरदास महाराज, माजी आ. हरिभाऊ भदे , ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, सुभाष बोन्द्रे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन सोहळ्यात अनेक साहित्यिकांच्या ग्रंथांचे प्रकाशनही पाहुण्यांच्या हस्ते होणार असल्याचे डॉ. टकले यांनी सांगितले.

संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांना विविध पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात येणार आहे. संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात चांदवडच्या जडणघडणीत होळकरांचे योगदान या विषयावर प्राचार्य दत्तात्रय बारगळ हे मार्गदर्शन करणार आहेत. महाराजा यशवंतराव होळकर यांचे देशासाठी योगदान या विषयावर प्रा. डॉ. मधुकर सलगरे यांचे व्याख्यान होईल तर धनगर जमातीची राजकीय स्थिती या विषयावर प्रा. डॉ. विजय शिरसाठ मार्गदर्शन करणार आहेत. संमेलनाच्या चौथ्या सत्रात प्रशांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होणार आहे. या कवी संमेलनात राज्यभरातील मान्यवर कवी आपल्या रचना सादर करणार आहेत. पाचव्या सत्रात पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर एकपात्री नाटक सादर होणार आहे. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी, रविवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत विविध परिसंवाद व चर्चासत्र होणार आहेत.यामध्ये धनगर समाजाची शैक्षणिक स्थिती या विषयावर प्राचार्य धोंडीराम गडदे आपले विचार व्यक्त करणार आहेत. धनगर जमातीच्या मेंढपाळ व्यवसायाची स्थिती : काल, आज आणि उद्या या विषयावर चंद्रकांत हजारे मार्गदर्शन करणार आहेत. पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकरांची त्रिजन्म शताब्दी एक आढावा या विषयावर राम लांडे हे आपले विचार व्यक्त करणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. मधुकर सलगरे, लक्ष्मण नजन यांचेही व्याख्यान होणार आहे.

संमेलनाच्या समारोप सोहळ्यास माजी आ. बच्चूभाऊ कडू, डॉ. यशपाल भिंगे, आयपीएस अधिकारी बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ पत्रकार दिलीप येडतकर, रेशमा पुणेकर , गणेश निंबाळकर, विनायक काळदाते आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून धनगर समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. टकले यांनी सांगितले. यावेळी चंद्रकांत हजारे, संभाजीराव सूळ, प्रा. डॉ. सलगरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी साहित्यिक उज्वलकुमार माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ज्येष्ठ समाजसेवक दगडूपंत नागनाथराव तेरकर यांचे दुःखद निधन

लातूर – रेणापूर येथील निवृत मुख्यद्यापक तथा जेस्ट समाजसेवक दगडूपंत नागनाथराव तेरकर यांचे वयाच्या ८६ वर्षी आज दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील एका खाजगी रुग्णालयात अल्पशा आजारामुळे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात शोककळा पसरली असून, सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



कै. तेरकर हे शांत, संयमी व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी आपल्या आयुष्यात समाजकार्यात सक्रिय सहभाग घेत अनेकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने तेरकर परिवारासह संपूर्ण भावसार समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.ते भावसार समाजाच्या सामाजिक कामात हिरारीने भाग घेत होते.

कै. दगडूपंत नागनाथराव तेरकर यांचा अंत्यविधी दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता भावसार समाज स्मशान भूमी, रेणापूर येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात संपन्न झाला. यावेळी भावसार समाजातील ज्येष्ठ नेते सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर,इंजिनिअर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्र्चात तीन मुले तीन मुली नातू पणतू जावई आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे.

# उन्हाळा सुरु: राज्य सरकार आणि शेतकऱ्यांची सामूहिक जबाबदारी !

**संपादकीय...**

उन्हाळ्याची चाहूल लागताच राज्यभर तापमानात वाढ होऊ लागते. पाण्याची टंचाई, जनावरांसाठी चाऱ्याचा अभाव, पिकांवर होणारा उष्णतेचा परिणाम अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे या काळात राज्य सरकार आणि शेतकरी या दोघांची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची ठरते.

सर्वप्रथम राज्य सरकारने पाण्याच्या योग्य व्यवस्थापनावर भर देणे गरजेचे आहे. जलसंधारण प्रकल्प, धरणांमधील पाण्याचे नियोजन, आणि गावागावात टँकरद्वारे पाणीपुरवठा यांची काटेकोर अंमलबजावणी करावी लागते. जलयुक्त शिवार सारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास पाण्याची कमतरता काही प्रमाणात कमी होऊ शकते.

शेतकऱ्यांसाठी सरकारने वेळोवेळी मार्गदर्शन करणेही तितकेच आवश्यक आहे. कमी पाण्यात येणारी पिके, ठिबक आणि तुषार सिंचन पद्धती यांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. यामुळे पाण्याची बचत होऊन उत्पादनातही वाढ होऊ शकते.

त्याचबरोबर पशुधनाचे संरक्षण हेही महत्त्वाचे आहे. सरकारने चारा छावण्या उभारणे, जनावरांसाठी पाणी व चारा उपलब्ध करून देणे, तसेच पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे ही जबाबदारी पार पाडली पाहिजे.

दुसरीकडे, शेतकऱ्यांनीही परिस्थितीची जाणीव ठेवून योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. पाण्याचा काटकसरीने वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, आणि पीकपद्धतीत बदल करणे या गोष्टी शेतकऱ्यांनी अंगीकारल्या पाहिजेत. सेंद्रिय शेती, मिश्र पीक पद्धती यांचा वापर केल्यास जोखीम कमी करता येते.

शेतकऱ्यांनी पाण्याचे साठवण करण्यावरही भर दिला पाहिजे. शेततळी, बांधबंदिस्ती यांसारख्या उपाययोजनांमुळे भविष्यातील पाण्याच्या समस्यांना तोंड देता येऊ शकते.

सरकार आणि शेतकरी यांच्यातील समन्वय हा या सगळ्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा आहे. योग्य नियोजन, परस्पर सहकार्य आणि जबाबदारीची जाणीव यामुळे उन्हाळ्यातील संकटावर मात करता येईल.

एकूणच, उन्हाळा हा केवळ आव्हानांचा काळ नसून नियोजन आणि जबाबदारीची कसोटी पाहणारा काळ आहे. राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे, तर शेतकऱ्यांनीही बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत शाश्र्वत शेतीकडे वाटचाल केली पाहिजे. अशा संयुक्त प्रयत्नांतूनच ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ राहू शकते.

अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधीच खबरदारी घेणे आवश्यक आहे. हवामान खात्याच्या अंदाजावर नियमित लक्ष ठेवावे. पावसाची शक्यता असल्यास काढणीस तयार असलेली पिके वेळेत काढून सुरक्षित ठिकाणी साठवावीत.

शेतात पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य व्यवस्था करावी, जेणेकरून पाणी साचून पिकांचे नुकसान होणार नाही. फळबागांमध्ये झाडांना आधार देऊन वाऱ्यापासून संरक्षण करावे. तसेच भाजीपाला पिकांवर प्लास्टिक किंवा शेडनेटचा वापर करावा. काढलेले धान्य व कडधान्ये झाकून ठेवावीत, ओलावा लागू नये याची काळजी घ्यावी. पशुधनासाठी सुरक्षित निवारा व कोरडा चारा उपलब्ध ठेवावा.

शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेत सहभागी व्हावे, जेणेकरून नुकसान झाल्यास आर्थिक मदत मिळू शकेल. कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन योग्य उपाययोजना केल्यास अवकाळी पावसाचा परिणाम कमी करता येतो.

# ज्ञान,शक्ती,भक्ती,ऊर्जा व बुध्दिमत्तेचा अथाग सागर महाबली हनुमान.

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत. हनुमान जन्मोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते.चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोस्तव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जन्मोत्सव साजरा केल्या जाते.भगवान प्रभु रामचंद्र विष्णुचे अवतार आहे तर महाबली हनुमान शंकरजींचा अवतार आहे.मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते.भारतात हनुमान जन्मोत्सवाला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते.महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुणांचा मोठा भंडार होता.त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी व राजनितीज्ञ होता. परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मर्यादांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली. परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला. कारण हनुमान रामाचे दुत म्हणून रावण दरबारी गेले होते.त्यामुळे हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपल्या रामभक्तीचे, ज्ञानाचे व शक्ती प्रदर्शन केले. कारण रामाचे संकट म्हणजे स्वत:चे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते.कारण राम, लक्षण,सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते.तीच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते. मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या पटांगणामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते.कारण गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वत: वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो किंवा शुभ प्रसंग अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुख:शांती निर्माण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते.श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले.कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. याप्रमाणे सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो.सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी वानरसेनेणे आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दील्या.यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या.त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवीले.अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतीत्थाने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला.परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली. सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम- सीता नाही त्याचा मला काय उपयोग?मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या ह्रदयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले.हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार?यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या,जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले! तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते, रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते.हनुमान जन्मोत्सवाला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील बदलत्या हवामानामुळे वाढते प्रदुषण रोखण्यासाठी व प्राणवायूची मात्रा वाढवीण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.कारण युद्धजन्य परिस्थिती व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे सर्वत्र वातावरण प्रदूषित होत आहे.करीता वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल. सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक्व नाही.महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे. यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल.हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार, बेरोजगारी ,भुकमरी, कुपोषण, शैक्षणिक समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे.असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवीणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ. कारण मुठभर राजकीय पुढाऱ्यांच्या भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो.आज हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल.असे जर झाले तर प्रत्येक झाडात,पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल.कारण महाबली हनुमान नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे.जय हनुमान.

=एक मुखाने बोला;जय जय हनुमान=

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मानसरंग नाट्य महोत्सवाने जिंकली लातूरच्या नाट्य रसिकांची मने

लातूर, लातुरात दि. २८ आणि २९ मार्च रोजी सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त सोसायटी फॉर वेल बी इंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन अर्थात स्वर च्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानसरंग नाट्य महोत्सव मोठ्या दिमाखदारपणे संपन्न झाला. या नाट्य महोत्सवाला लातूरच्या रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्रत्येक नाटकासाठी जवळपास ६०० पेक्षा जास्त प्रेक्षक उपस्थित होते.

मानसिक आरोग्यविषयक विविध विषयांना स्पर्श करणारी चार नाटके या महोत्सवामध्ये सादर करण्यात आली. २८ तारखेला सकाळी ११ वाजता या नाट्यमहोत्सवाचा उद्घाटन समारंभ डॉ. मिलिंद पोतदार यांच्या मातोश्री शालिनी पोतदार व प्रख्यात दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव यांच्या हस्ते नटराज पूजन व दीप प्रज्वलन करून संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ बालरोग तज्ञ डॉ. अशोक आरदवाड, श्रुतिकांत ठाकूर, संजय अयाचित, धनंजय बेंबडे आदी मान्यवर उपस्थित होते. मुग्धा पोतदार यांनी नाट्य महोत्सवाचे प्रास्ताविक केले. आरोही पोतदार हिने सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली.

या महोत्सवाचे पहिले पुष्प नाट्य स्पंदन प्रतिष्ठान लातूर द्वारा निर्मित श्रुतिकांत ठाकूरद्वारा दिग्दर्शित 'आनंद ओवरी' हे नाटक सादर झाले. डॉ. मिलिंद पोतदार यांनी यामध्ये तुकारामाचा लहान भाऊ कान्होबाची भूमिका सादर केली. संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावर भेटलेले हे नाटक प्रेक्षकांना भावले तुकारामाच्या शोधात असलेल्या त्यांचा लहान भाऊ कान्होबाच्या स्वगतामधून तुकारामाचा जीवन प्रवास तर उलगडलाच पण त्याचबरोबर संसारिक सुख-दुःखांमध्ये अडकलेल्या व त्यांना धीराने तोंड देणाऱ्या विपरीत परिस्थितीतही



खचून न जाता त्याला सामोरे जाण्याचा वस्तू पाठ कानोबाने सर्वांसमोर मांडला. नाटकानंतर झालेल्या चर्चेमध्ये डॉ. अनघा राजपूत यांनी डॉ. मिलिंद पोतदार व श्रुतीकांत ठाकूर यांच्याशी संवाद साधला व मानसिक आरोग्याशी निगडित सविस्तर चर्चा करण्यात आली. दुपारी सादर झालेले दुसरे नाटक 'मन 'अभिजीत झुंजारराव यांनी दिग्दर्शित केलेले व रमेश वाणी या समर्थ अभिनेत्याने सादर केलेले हे एकपात्री नाटक सादर झाले. एका निळकंठ नावाच्या सामान्य माणसाच्या जीवनप्रवासातील त्याच्या मनात कारणांनी चाललेला विचारांचा गोंधळ भावनांचा , त्याच्या वैयक्तिक,कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर होणारा परिणाम प्रेक्षकांसमोर मांडला. माणसाच्या मनामध्ये सातत्याने निर्माण होणारे परस्परविरोधी विचार आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा त्याच्यावर होणारा परिणाम व त्याच्या विचारानुसार त्या परिस्थितीला सामोरे जाणे याविषयी नाटकानंतर डॉ. मिलिंद पोतदार यांनी अभिजित झुंजारराव व रमेश वाणी यांच्याशी संवाद साधला.

दि. २९ मार्च रोजी सकाळी सादर झालेले तिसरे नाटक प्रख्यात अभिनेत्री विभावरी देशपांडे लिखित व दिग्दर्शित 'मग तू मला खा' हे सादर करण्यात आले. आजच्या युगातील मुले व तरुण यांच्यामध्ये स्वतःच्या दिसण्याबद्दल स्वतः च्या शरीरयष्टी बद्दल असणारे अनेक समज – गैरसमज, स्वतःच्या इमेज बद्दलच्या संकल्पना समाज माध्यमांवर उमटणाऱ्या प्रतिक्रियांचा त्याच्यावर होणारा परिणाम याच्यावर हे नाटक अत्यंत परिणामकरीत्या भाष्य करते. नववी दहावी या वर्गामध्ये असलेली मुले मुली आपल्या दिसण्याबद्दल कशी

चुकीच्या पद्धतीने संकल्पना बाळगतात व त्यामुळ त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये कसे टोकाचे नकारात्मक बदल होत जातात व त्यातून आत्मविश्र्वास गमावून बसल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कसे परिणाम होतात हे अत्यंत प्रभावीपणे या नाटकामध्ये मांडण्यात आले. या अनुषंगानेच नाटकानंतर नाटकातील सर्व कलाकारवृंद तसेच डॉ. वर्षा पाटील वरिष्ठ मानसोपचार तज्ञ लातूर यांच्याशी डॉ. मिलिंद पोतदार यांनी संवाद साधला व आपले असणे व दिसणे याल कसे महत्त्व द्यायला हवे व स्वतःबद्दलच्या संकल्पना कशा विकसित करायला हव्यात याबद्दल चर्चा केली

त्यानंतर दुपारी सादर झालेले दत्ता पाटील लिखित सचिन शिंदे दिग्दर्शित 'तू राजहंस एक' हे नाटक सर्वांच्या काळजाचा ठाव घेऊन गेले. ग्रामीण भागामध्ये राहणारा सुशिक्षित तरुण शेतकरी परिस्थितीच्या ओझ्याने कसा दबला जातो, त्याच्या लग्न होण्यामध्ये कशा अडचणी येतात, शेतकरी असल्यामुळे त्याचा स्वीकार होत नाही व वारंवार त्याला नकार पचवावा लागतो. दुसरीकडे आर्थिक विवंचना व समाजातील सर्वांचाच त्याकडे बघण्याचा हिन दृष्टिकोन यामुळे त्याच्या मानसिकतेवर कसे परिणाम होतात हे या नाटकातून पाहायला मिळाले. समर्थ लेखक व अभिनेता प्राजक्त देशमुख यांनी सुंदरपणे काळजाचा ठाव घेणाऱ्या पद्धतीने ही शेतकरी तरुणाची मनोवस्था प्रेक्षकांसमोर मांडली. इतर कलाकारांनी तेवढ्याच दमदारपणे त्यांना साथ दिली. त्यानंतर झालेल्या चर्चेमध्ये डॉ. मिलिंद पोतदार यांनी लेखक व अभिनेत्यांशी संवाद साधला. एकंदरीतच आजच्या तरुण शेतकऱ्याची जी मनोवस्था आहे त्याच्याबद्दल समाजाने सहानुभूतीपूर्वक विचार करणे व त्याला आस्थेने धीर देणे कसे गरजेचे आहे व त्यामुळे आत्महत्येच्या विचारापर्यंत पोहोचलेल्या व्यक्ती देखील त्यापासून परावृत्त होऊन जगण्याला संमुख होतो. परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार होऊ शकतो, ही बाब अधोरेखित केली.

महोत्सवाच्या शेवटी डॉ. मिलिंद पोतदार यांनी या महोत्सवाच्या आयोजनामध्ये व यशस्वीतेमध्ये सहभाग नोंदवलेल्या सर्व संस्था व्यक्ती हॉस्पिटल मधील स्टाफ व या कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करणारे विविध विद्यालय – महाविद्यालयातील ५० विद्यार्थी यांच्या प्रति ऋण व्यक्त केले. हा मानसरंग नाट्य महोत्सव लातूरच्या सांस्कृतिक इतिहासामधील एक मैलाचा दगड ठरावा या पद्धतीने याची आखणी केली गेली होती. प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच मनोरंजनातून सामाजिक भान जागविण्याचे उत्तम उदाहरण म्हणून या नाट्य महोत्सवाकडे पाहता येईल डॉ.मिलिंद पोतदार व मुग्धा पोतदार यांच्या संकल्पनेतून व अनेकांच्या सहकार्यातून हा यशस्वी नाट्य महोत्सव उभा राहिला. असे सांस्कृतिक कार्यक्रम लातूरमध्ये वारंवार होत राहावेत व त्यातून समाजप्रबोधनाचा एक नवीन पायंडा पडावा अशी अपेक्षा डॉ. मिलिंद पोतदार यांनी व्यक्त केली.

### कमवा रे ..

मार्चएंड असे माहभर
लवकर ना होई अस्त
कामेकरावी बॅकडेटेड
लाल फितीवरी भिस्त
खुशाल घ्या चिरीमिरी
स्वभाव नको भिडस्त
वर पर्यंत पोचवायचे
चिंब भिजवावे समस्त
पडणार नाही रे धाडी
करून घ्यावे आश्र्वस्त
गडबड नको वाटेतली
साखळीवर सर्वभिस्त
ऑनलाईन जरा जपा
वेळेवरी चुका दुरुस्त
लूपहोल ना कसलेही
चाणाक्ष हवा मध्यस्थ
हप्ता चाले कुठे कुठे
रक्कम घ्या एकमुस्त
मार्च अखेर कमाईचा
लिंकींग हो जबरदस्त
पुरावे खोलवर पुरावे
साफसुधरे हवेत दस्त
मागे सी बी आय ईडी
बस्तान संस्था उध्वस्त
कंत्राटदार तसे हुशार
झालेले भलतेचं त्रस्त
स्वताचं पाडे पाऊस
बिचारे दुष्काळ ग्रस्त

### दृष्टिकोण ...

जन्माने जाती धर्म
ओळखतोअकारण
कर्माने जात सिध्द
करत राही आपण
भग्वान महावीरांची
अद्भुत रे शिकवण
अरिहंतांचेज्ञानामृत
मनात करे साठवण
शरीर रुपा बदललेलं
करता केवळ मुंडण
समता विचार धारा
मानवा बनवे शर्मण
जात ना होते सिध्द
पूजा अर्चा न् तर्पण
सदाचार सद्वर्तनाने
आत्मचर्येनी ब्राह्मण
होत नसती मुनीवर
अरण्या राहून कोण
ज्ञान सर्वव्यापी घेई
बदलेल रे दृष्टिकोण
वल्कले घालून फक्त
ना येईल तपस्वीपण
षड्रिपु दुराचार मुक्त
अंगी रुजवा सद्गुण
सप्त जैन तत्वे जाण
फिटेलजिवीत्व ऋण
मोक्षमार्ग सुकर होय
कळता तिर्थकर गुण

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# माओवादाविरुद्ध लढा दिलेल्या सी-६० जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-६० पदक' देण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. ३० : माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळविले आहे. आता माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली आहे. त्यामुळे किमान तीन वर्षे सी–६० मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी–६० पदक' देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद झाली. या परिषदेस गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच भारतीय पोलिस प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

गडचिरोलीसारख्या भागात आता विकासाचे नवे चित्र उभे राहत असून लोकशाहीची मुळे बळकट होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली असून आता तिच्या पुनरुज्जीवनाला आळा घालणे हे पुढील मोठे आव्हान आहे. या संघर्षात २४४ पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर ६०९ नागरिकांनी प्राण गमावले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस यंत्रणेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत, गुन्हे अन्वेषण आणि न्यायप्रक्रियेत 'एंड टू एंड' डिजिटायझेशन आवश्यक असल्याचे सांगितले. विविध अन्वेषण आणि क्राईम मॉडेल्सचा समन्वय साधून संपूर्ण क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डिजिटल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. डिटेक्शनपासून एव्हिडन्स संकलन, चार्जशीट दाखल करणे यांसह सर्व प्रक्रिया शंभर टक्के डिजिटल झाल्यास पुराव्यांची अचूकता आणि साखळी अधिक मजबूत होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, नवी मुंबईत राबविण्यात आलेल्या ब्लॉकचेन–आधारित एव्हिडन्स मॅनेजमेंट सिस्टीमप्रमाणे प्रणाली राज्यभर लागू केल्यास पुराव्यातील छेडछाड रोखता येईल, असे सांगून पुढील सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये ही प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण (कन्व्हिक्शन रेट) वाढवण्यास अपयशी ठरलेल्या प्रकरणांचे विश्र्लेषण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'सीआयडी'ला दिले. राज्यातील गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषारोप दर वाढवण्यासाठी ठोस कार्यपद्धती (एसओपी) आणि स्पष्ट रोडमॅप तयार करावा असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचबरोबर पोलीस आणि सरकारी वकिलांच्या कामगिरीचे स्वतंत्र मूल्यमापन करणारा डॅशबोर्ड विकसित करण्यावर त्यांनी भर दिला.

रस्ते अपघातांबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले नागपूर आणि मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील प्रयोगांमुळे अपघातात घट झाली आहे. त्यामुळे योग्य तंत्रज्ञान आणि रणनीती वापरून मृत्यूदर कमी करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

सायबर सुरक्षेबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मशी अधिक प्रभावी समन्वयाची गरज व्यक्त केली. आक्षेपार्ह किंवा धोकादायक मजकूर हटवण्यासाठी विलंब टाळण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याचे निर्देश त्यांनी दिले. सायबर स्पेसमध्ये वाढणाऱ्या रॅडिकलायझेशनकडे लक्ष वेधत, यावर प्रोक्टिव्ह उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी पोलीस यंत्रणांना केले.

पोलीस दलातील अंतर्गत संवादावर भर देताना, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कनिष्ठांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. नेतृत्व म्हणजे लोकांना प्रेरणा देणे असे नमूद करत, अधिकाऱ्यांनी स्वतः च्या वर्तनातून आदर्श निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर, प्रत्येक अधिकाऱ्यांने जनतेशी संवाद साधण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी गुन्हेगारीविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण कठोरपणे राबवण्याचे निर्देश पोलीस अधिकाऱ्यांना दिले. ड्रग्ससंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही समस्या पुढील पिढीला पंगू करणारी आहे, अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करून पूर्णतः आळा घालण्याचे आदेश त्यांनी दिले. बेकायदेशीर कृत्यांकडे कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मागील काळात फॉरेन्सिक कामांच्या प्रलंबित प्रकरणात पोलीस प्रशासनाने ठोस उपाययोजना राबवत ही पेंडन्सी लक्षणीयरित्या कमी करण्यात यश मिळवले आहे. पूर्वी २ ते ३ लाखांपर्यंत प्रकरणे प्रलंबित राहत होती, ती आता मोठ्या प्रमाणात घटली असून ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. पुढील काळात सर्व प्रलंबित प्रकरणे पूर्णपणे निकाली काढून फॉरेन्सिक कामकाज रिअल–टाइम पद्धतीने करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पोलीस दलात चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरमहा पुरस्कार योजना सुरू करण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांना केली. तसेच अपेक्षित कामगिरी न करणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

# जिप सभापती सौ. शिवकन्या गोडभरले यांचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

लातूर दि. ३० – लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापतीपदी भाजपाच्या सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडीबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुक्यातील खरोळा जिल्हा परिषद गटातून बहुमताने विजयी झालेल्या भाजपाच्या सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांची लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड झाली. निवड जाहीर झाल्यानंतर भाजपाच्या संवाद कार्यालयासमोर फटाके फोडून नूतन सभापती शिवकन्याताई गोडभरले यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी नूतन सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अंगणवाडीसह महिलांचे व इतर प्रश्र्नाची निश्र्चितपणे सोडवणूक होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंखे, सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, अनिल भिसे, राजकिरण साठे, प्रताप राऊतराव, सुरेंद्र गोडभरले, लक्ष्मण यादव, निवृत्ती चिद्रे, सुधाकर काळे, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, संतोष चव्हाण, रुपेश काळे, अशोक सावंत, राजू मानमोडे, शुभम खोसे, वैभव मगर, बालाजी गवळी, नारायण राठोड, पुरी महाराज, बालाजी मानमोडे, दिलीप पाटील, प्रशांत रायनूळे यांच्यासह अनेकांनी नवनिर्वाचित सभापती सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांचे अभिनंदन केले.

# भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या नगरसेविकांच्या कार्यशाळेला चांगला प्रतिसाद

लातूर दि३०– महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करत असताना पालिकेच्या बजेटचा अभ्यास करून विकास कामाची मागणी पाहिजे असे मत ज्येष्ठ माजी नगरसेवक अशोक गोविंदपूरकर यांनी व्यक्त केले.



भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या वतीने लातूर शाखेच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेविका साठी कार्यशाळा आयोजित केली होती . १९ नगरसेविका या कार्य शाळेला उपस्थित होत्या . मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी डॉ अर्चना आपटे यांचे हमको मन की शक्ती देना प्रेरणा गीत म्हटले . मान्यवराचे स्वागत संघटनेच्या शहर अध्यक्ष प्रेमा बाहेती आणिसचिव संजीवनी सबनीस यांनी केले.भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या राष्ट्रीयअध्यक्ष्य कुमुदिनी भार्गव यांनी प्रास्ताविक करून संघटनेची माहिती देऊन कार्यशाळा आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली.यशस्वी नगरसेवक होण्या साठी घरच्या जबाबदाऱ्या आणि नगरसेवक म्हणून करायची कामे, लोकाच्या अपेक्षा पुर्ण करताना महिलाना नियोजन करणे आवश्यक असल्याचे भार्गव यांनी नमूद केले.

अशोक गोविंदपूरकर यांनी लातूर नगर पालिकेचा इतिहास, आरक्षण नसतानाही केशरबाई भार्गव सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरसेवक म्हणून केलेल्या कामाची माहिती करून दिली. पक्षाच काम म्हणजे नगरसेवक पद नाही असे सांगत नागरसेविकांच्या जबाबदाऱ्या काय असतात ,आणि बजेट विषय अत्यंत सखोलपणे मांडला . माजी नगरसेवक

ॲड . स्मितााताई परचुरे यांनी त्या नगरसेविका असतानाचे कांहीं अनुभव आणि पक्ष निरपेक्ष कार्य किती महत्वाचे ते सांगितले .

जेष्ठ पत्रकार अरूण समुद्रे यांनी संवाद आणि आणि संपर्क ही शक्तीस्थळे असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात लातूर शाखेने प्रत्येक नगरसेविकेला स्मृतिचिन्हाने सन्मानित केले . प्रातिनिधिक स्वरूपात प्रेरणा होनराव आणि स्वाती घोरपडे यांनी मनोगत व्यक्त केले डॉ सुरेखा काळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यशाळेचे सूत्रसंचलन अनघा अंधोरीकर यांनी केले .

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग ३१ मार्च रोजी बंद राहणार

लातूर, दि. ३० : श्री महावीर जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग मंगळवार, ३१ मार्च, २०२६ रोजी बंद राहील. तसेच बुधवार, १ एप्रिल, २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ. पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

## जयभीमनगर येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंकर गायकवाड

लातूर : लातूर शहरातील जयभीमनगर येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंकर गायकवाड, उपाध्यक्षपदी अजय जोगेश्र्वरी तर सचिवपदी सारनाथ सोनकांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

जयभिम नगर येथील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सदरची कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध कार्यक्रम आणि उपक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे यावेळी ठरले. उर्वरित कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे. जयंती मंडळाच्या कोषाध्यक्षपदी निलेश गायकवाड, सहसचिव चेतन वाघमारे सहकोषाध्यक्ष आकाश ढगे सल्लागार संग्राम वाघमारे, सचिन फुले, अविनाश सूर्यवंशी, मार्गदर्शक अविनाश बर्गे भैया, विशाल भाऊ गवळी अभिमन्यू तात्या लामतुरे, मारुती चक्रे, किशोर कांबळे यांची निवड करण्यात आली.

## लातूर जिल्ह्यात १ एप्रिलपासून चार विशेष डिजिटल शेती शाळा; कृषी विभाग व पाणी फाउंडेशनचा पुढाकार

लातूर, दि. ३०: नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) अभियान स्वरूपात राबवण्यात येणाऱ्या हवामान अनुकूल तंत्रज्ञान उपक्रमांतर्गत, लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने हे प्रशिक्षण पार पडणार असून, जिल्ह्यातील प्रत्येक गावातील किमान ३० ते ४० शेतकऱ्यांनी यात ऑनलाईन पद्धतीने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

पाणी फाउंडेशनद्वारे संचलित ही डिजिटल शेती शाळा एक प्रगत ऑनलाईन व्यासपीठ असून, याद्वारे तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना पीकनिहाय शास्त्रोक्त मार्गदर्शन झूम (नो) आणि युट्युब (धीर्ढीलश) च्या माध्यमातून दिले जाणार आहे. या उपक्रमात कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, समूह सहाय्यक, तसेच कृषी ताई व कृषी सखी यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. गावनिहाय नियोजन करून एका मध्यवर्ती ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्रित उपस्थित राहावे, यासाठी कृषी विभागाने जय्यत तयारी केली आहे.

या विशेष शेती शाळांचे वेळापत्रक चार भागांत विभागले असून, त्याचे सत्र निश्र्चित केलेल्या दिवशी सायंकाळी ७:३० वाजता सुरू होईल. याची लिंक गावनिहाय व्हॉट्सप ग्रुपद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या भागात १ एप्रिल रोजी पेरणीपूर्व तंत्रज्ञान, बेड तयार करणे, टोकण पद्धत, आंतरपीक आणि बीजप्रक्रिया यावर मार्गदर्शन होईल. दुसऱ्या भागात ८ एप्रिल रोजी बीजामृत, जिवामृत आणि दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक व नैसर्गिक निविष्ठा निर्मितीवर भर दिला जाईल. तिसऱ्या भागात १५ एप्रिल रोजी एकात्मिक कीड व्यवस्थापन, सापळा पिके आणि मित्र कीटकांचा वापर यावर चर्चा होईल, तर चौथ्या भागात २२ एप्रिल रोजी भात शेती लागवडीचे आधुनिक तंत्र व यांत्रिकीकरण याविषयी सविस्तर माहिती दिली जाणार आहे. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या डिजिटल शेती शाळेचा लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत लातूरमध्ये जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा विकास केंद्रांचा शुभारंभ; १० एप्रिलपर्यंत अर्जांचे आवाहन

लातूर, : राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने 'मिशन लक्ष्यवेध' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला असून, या योजनेतंर्गत लातूर जिल्ह्यासाठी थलेटिक्स, कुस्ती, लॉन टेनिस आणि शूटिंग (नेमबाजी) या चार खेळांच्या अनिवासी जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा केंद्रांना मान्यता मिळाली आहे. या केंद्रांमध्ये प्रवेशासाठी पात्र खेळाडूंनी १० एप्रिल २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत प्रत्येक खेळासाठी २० खेळाडूंची निवड केली जाणार आहे. या निवडीसाठी ३१ डिसेंबर २०२६ रोजी २१ वर्षांखालील वय असलेले मुले व मुली पात्र असतील. अर्जासोबत जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल), मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, तीन पासपोर्ट साईज फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र आणि पालकांचे संमती पत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच, शासकीय मान्यताप्राप्त डॉक्टरने दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य असून खेळाडूने शालेय किंवा अधिकृत संघटनांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवलेला असावा किंवा पदक प्राप्त केलेले असावे.

निवड झालेल्या खेळाडूंच्या क्रीडा कौशल्य आणि शारीरिक तंदुरुस्तीची चाचणी घेतली जाणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून खेळाडूंना अनिवासी क्रीडा प्रशिक्षण, अत्याधुनिक क्रीडा सुविधा, साहित्य, खेळाडू कीट, तसेच देशांतर्गत व परदेशातील स्पर्धांसाठी येणारा खर्च, वैद्यकीय उपचार, विमा आणि स्पोर्ट्स सायन्स सेंटर यांसारख्या उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल परिसर, औसा रोड, लातूर येथे प्रत्यक्ष अथवा वीश्रर्रीीीशवळषारळश्र.लो या ईमेलवर १० एप्रिलपर्यंत सादर करावेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा किंवा उदगीरचे तालुका क्रीडा अधिकारी जयराज मुंढे (मो. ९७६४०३२३३३) यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## शासन व पोलिसांचे कार्य जनतेची सेवा करणे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, : ब्रिटिशांना भारतावर राज्य करायचे होते म्हणून त्यांनी राज्यकर्त्यांच्या भूमिकेतून फौजदारी कायदे आणले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात या कायद्यांमध्ये बदल करून जनतेच्या सेवेसाठी फौजदारी कायदे तयार झाले. यामुळे देशात पोलीस व्यवस्था आणि अपराधिक न्याय प्रणालीत सुसूत्रता येऊन जनतेला जलद व योग्य न्याय मिळत आहे. सर्व राज्यांनी या कायद्यांची उत्तम अंमलबजावणी सुरू केली असून शासन व पोलिसांचे कार्य जनतेची सेवा करणे असल्याचे यातून अधोरेखित होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. पोलीस मुख्यालय स्थित शिवाजी क्रिडांगणावर आयोजित ६९ व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशाच्या विकासात कायदा व सुव्यवस्थेला अनन्य साधारण महत्त्व आहे. देशासमोर उभ्या राहिलेल्या मोठ्या आव्हानांच्या वेळी पोलीस विभागाने तत्परतेने प्रथम प्रतिसाद देऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यात मोलाचे योगदान दिले आहे. ६९ व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजक पद महाराष्ट्राला व नागपूरला मिळाले आहे. तसेच देशात या मेळाव्याचे पहिले आयोजनही नागपूरमध्येच झाले याचे समाधान आहे. या मेळाव्यात गुन्हे शोधणात व्यावसायिक कौशल्य, न्याय वैदक विज्ञान, संगणक प्रणाली आणि श्र्वान प्रशिक्षण आदी विषयांवर चर्चा, परिसंवाद, स्पर्धा होणार आहेत. वेगवेगळ्या राज्यातील चांगल्या कार्य पद्धतीची देवाण–घेवाण होणार आहे. यातून सामान्य जनतेला न्याय देण्याच्या कार्यात अधिक स्पष्टता व गती येणार असल्याचा विश्र्वास आहे. महाराष्ट्र पोलीस विभागानेही गुन्ह्यांच्या बदलत्या आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी अनेक महत्वाचे बदल केले असून देशातील मोठे, आधुनिक, व्यावसायिक पोलीस दल म्हणून लौकिक मिळवला आहे.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ‘शिवशाही पुनर्वसन’ प्रकल्पाला बळकटी – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, दि. ३० : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या उद्देशाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना केली होती, तोच वारसा पुढे नेत झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न आम्ही पूर्ण करणार आहोत. पारदर्शकता आणि वेग ह्याला आमची प्राथमिकता असून प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी आता खासगी विकासक आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांच्यात ‘विशेष संयुक्त उपक्रम’ (एसपीव्ही) तयार करण्यास मान्यता देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

नंदनवन बंगला येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवशाही पुनवर्सन प्रकल्पाच्या संचालक मंडळाची बैठक झाली. त्यावेळी बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, शिवशाही प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक कुणाल कुमार, महाव्यवस्थापक अशोक नाईकवडे आदी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईसह राज्यातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेला वेग देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून ‘शिवशाही पुनर्वसन प्रकल्पा’ला बळकटी देण्याचा निर्णय घेतला आहे.



एसपीव्ही मुळे पुनर्वसनाचे प्रकल्प खासगी क्षेत्रातील कौशल्याच्या मदतीने जलदगतीने पूर्ण होऊ शकतील. त्याचबरोबर रखडलेले पुनर्वसन प्रश्न मार्गी लावून सर्वसामान्यांना हक्काची घरे देतानाच शिवशाही प्रकल्प कंपनीने एमएमआरडीए, एसआरए, म्हाडा, सिडको, मुंबई महापालिका, ठाणे पालिका यासारख्या शासकीय संस्थांच्या माध्यमातून रखडलेल्या प्रकल्पांना वेग द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तांत्रिक अडचणींमुळे रखडलेले प्रकल्प शिवशाही प्रकल्पात घेतले तर ते वेगाने पूर्ण होवू शकतात. शिवशाही शासकीय कंपनी असल्याने तांत्रिक अडथळ्यांवर मार्ग काढतानाच चटई निर्देशांकाचा फायदा देखील मिळू शकतो त्याने प्रकल्पाला अधिक गती मिळू शकेल.

केवळ घरेच नव्हे, तर झोपडपट्टी भागातील लोकांच्या हाताला काम मिळावे यासाठी या पुनर्वसन प्रकल्पांतर्गत एमएसएमई पार्क उभारण्यात यावे. तसेच, शासनाच्या महत्त्वाकांक्षी ‘लाडकी बहीण’ योजनेच्या धर्तीवर महिलांसाठी ‘लघु उद्योग प्रकल्प’ सुरू करण्याबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

शिवडी येथील राहुलनगर मधील इमारत क्र. २ दुरुस्तीच्या विषयावर यावेळी चर्चा झाली. ७२ सदनिकांच्या स्ट्रक्चरल मजबुतीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला ४ कोटी रुपयांचा निधी देण्यास मंजुरी देण्यात आली. ९ खासगी विकासकांकडे संक्रमण सदनिकांचे १४३.४४ कोटी भाडे थकीत असून वसुली सुलभ व्हावी म्हणून वार्षिक भाडेवाढ १० टक्के ऐवजी ५ टक्के करणे आणि विलंब शुल्क १६ टक्के ऐवजी ८ टक्के करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

शिवशाही प्रकल्पाला अधिक बळकटी देण्यासाठी मनुष्यबळाची उपलब्धता व्हावी यासाठी एसआरएच्या धर्तीवर मनुष्यबळ निर्मितीचा सुधारित आराखडा सादर करण्याचे निर्देशही यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

## कामगार कर्मचारी संघाची नवी मुंबई विमानतळ व्यवस्थापन समितीची कार्यकारिणी जाहीर भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत घोषणा

मुंबई : अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीची भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी घोषणा करण्यात आली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिका–यांना रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. चव्हाण यांनी सर्व नवनियुक्त पदाधिका–यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे सरचिटणीस सुहास माटे, संयुक्त सरचिटणीस रुपेश धुमाळे, संयुक्त सरचिटणीस योगेश आवळे, उपाध्यक्ष साई घोगळे, सचिव शरद येटम, कार्यकारी अध्यक्ष जितेंद्र राऊत, निशांत गायकवाड यांच्यासह कमर्चारी संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी अखिल भारतीय माथाडी संघटनेची कार्यकारिणीही घोषित करण्यात आली.

यावेळी श्री. रविंद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये तळागाळातील प्रत्येक घटकाला न्याय देणे, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन प्रशासन समन्वयातून सर्वांनी मिळून काम करायचे आहे. कोणावरही अन्याय होणार नाही आणि अन्याय आम्ही करणार नाही या भूमिकेतून काम करण्याची पद्धत अवलंबत न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

नवी मुंबई विमानतळ व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीमध्ये संयुक्त सरचिटणीस रुपेश धुमाळे, उपाध्यक्ष किरण पवार, युहान केर्सी दोराबाजी आणि सुजित न्यायनिर्गुणे यांची तर सचिव म्हणून प्रभुदास भोईर, मुखांश नाईक, गजानन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे .

अखिल भारतीय माथाडी संघटनेची कार्यकारिणी घोषीत झाली त्यात रायगड जिल्हा अध्यक्षपदी जितेश शिंदे, भिवंडी पालघर जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन जोशी, ठाणे उरण उपाध्यक्षपदी विक्रांत भोसले, दक्षिण मुंबई उपाध्यक्षपदी राहुल लहासे, वरळी विधानसभा अध्यक्षपदी शैलेश तोडकरी आणि वरळी विधानसभा सरचिटणीस पदी समीर शेख यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

# मोठ्या प्रमाणात संधी मिळाल्याने आदिवासी समाज नव्या तेजाने उभा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, : ‘आदिवासी बांधवांना शिक्षण, रोजगाराच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे हा समाज आता नव्या तेजाने उभा राहिला असून आता हा समाज मागे वळून पाहणार नाही’, असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. मायाताई इवनाते यांनी संधीचे सोने करून समाजाच्या कायम स्मरणात राहील असे कार्य करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

मायाताई चिंतामणराव इवनाते सत्कार समितीच्या वतीने राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार मायाताई इवनाते यांचा नागरी सत्कार करण्यात आला. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित या सत्कार सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार सुधाकरराव देशमुख, महापौर नीता ठाकरे यांची प्रामुख्याने उपस्थित होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेल्या मायाताईंनी अत्यंत संघर्ष करत आपली राजकीय कारकीर्द घडविली आहे. आपल्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी लोकांचा विश्र्वास संपादन केला. आदिवासी बांधवांच्या प्रश्र्नांवर त्यांनी मोठे काम केले. अगदी देशपातळीवर फिरून त्यांनी त्यांचे असंख्य प्रश्र्न सोडवले. त्यामुळेच त्यांना देशाचे सर्वोच्च सभागृह असलेल्या राज्यसभेवर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. आमच्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. नगरसेवक, महापौर, केंद्रीय जनजाती



आयोगाच्या सदस्या म्हणून त्यांची कारकीर्द अत्यंत निष्कलंक राहिलेली आहे. कुटुंबात घडलेल्या दुदैवी घटनेने त्या खचल्या नाहीत, तर त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरुच ठेऊन आपल्या नेतृत्वाचे वेगळेपण सिद्ध केले आहे.

राज्यात आदिवासी बांधवांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व्यापक स्तरावर काम होत आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणाची सोय होत आहे. त्यांच्या परदेशातील शिक्षणासाठीही शासनाने तरतुदी केल्या आहेत. संधी मिळाली तर आदिवासी मुले संधीचे सोने करतात, हे त्यांनी आपल्या विविध कौशल्यांच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. कुपोषण मुक्तीच्या कार्यात महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

शिक्षणातूनच समाजाची प्रगती – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

समाजात ज्ञानाचा प्रसार होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती होते. आदिवासी समाजाची परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. संपूर्ण समाज विकासाच्या या यात्रेत सहभागी होईल, तेव्हा त्या समाजाला दिशा देण्याचे कार्य मायाताईंसारख्या नेतृत्वाला करावे लागेल. समाज आज त्यांच्याकडे अत्यंत आशेने पाहतो आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना केले.

मायाताईंचे जीवन अत्यंत कठीण परिस्थितीत आणि संघर्षात गेले असा उल्लेख करुन श्री. गडकरी म्हणाले, त्यांच्याकडे आलेल्या प्रत्येक जबाबदारीचा वापर त्यांनी सामाजाच्या कल्याणासाठी केला आहे. त्यांच्या नेतृत्वात समाज आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीकडे वाटचाल करेल, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

हा सन्मान माझ्या समस्त आदिवासी बांधवांचा – मायाताई इवनाते

आदिवासी समाजाचे दुःख आपण जवळून पाहिले आहे. समाजासाठी बरेच काही करायचे आहे. संसदेत त्यांची प्रतिनिधी या नात्याने त्यांचे प्रश्र्न मांडायचे आहेत. देश बदलत असताना या बदलांमध्ये माझ्या आदिवासी बांधवांचा मोठा वाटा असेल, अशा भावना मायाताई इवनाते यांनी सत्कारास उत्तर देताना व्यक्त केल्या.

याप्रसंगी आदिवासी विकास युवा संघ, ट्रायबल इन्स्टिट्यूट अँड मल्टीपर्पज एज्युकेशन सोसायटी, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, संयुक्त आदिवासी कृती समिती, आदिवासी उडान बहुउ्ददेशीय संस्था, इंडिजिनिअस ट्रायबल वुमेन फोरम या संघटनांसह इतर विविध संघटनांच्या वतीने मायाताई इवनाते यांचा सत्कार करण्यात आला. या संघटनांचे पदाधिकारी आकाश मडावी, महेंद्र उईके, राजेंद्र मरस्कोल्हे, विवेक नागभिरे, प्रशांत कुमरे, विनोद मसराम, दिनेश शेराम, सदाराम गाते, आशा तुमडाम यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी बांधवांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्यामल देशमुख यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. महेंद्र उईके यांनी आभार मानले.

## ‘आयडिएशन कॉम्पिटिशन ३.०’ विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना देणारी ठरेल – कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

मुंबई, दि.३० : कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून




नवकल्पनांना प्रोत्साहन देणारा आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० हा उपक्रम उद्योजकतेकडे वाटचाल करणारा ठरेल, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण सोसायटी आणि आयस्पार्क फांउडेशन यांच्या पुढाकाराने आयडिएशन कॉम्पीटीशन ३.० ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमात मंत्री लोढा बोलत होते.

अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नवकल्पनांना चालना देणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पाटील यांनी राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत राबविण्यात येणा–या योजनांची माहिती दिली.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांनी इनक्युबिशेनसाठी आवश्यक असलेली सर्व मदत विद्यापीठाच्या वतीने दिली जाईल. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि वाढता सहभाग पाहून स्टार्टअप इकोसिस्टमला मिळणारे बळ स्पष्ट होत आहे असेही त्या म्हणाल्या.

आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० मध्ये ४०० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहकार्याने, आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ५० हून अधिक महाविद्यालयांमधील १३० गटांनी या स्पर्धेत सहभाग घेतला या स्पर्धेतून तीन विजेते लवकरच घोषित केले जाणार आहेत.

विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे, त्यांना जोपासणे आणि वास्तविक जगातील आव्हानांवर उद्योजकीय उपाय विकसित करण्यासाठी सक्षम करणे, हे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.२०२४ मध्ये सुरू झालेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि उद्योजकीय संस्कृती रुजवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशील कल्पनांचे रूपांतर शाश्र्वत उद्योगांमध्ये करण्यास मदत केली जाते. हा उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांचे रूपांतर प्रभावी स्टार्टअपमध्ये करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो, ज्यामध्ये त्यांना मार्गदर्शन, निधीच्या संधी आणि इनक्युबेशन सपोर्ट मिळतो. आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० हे ‘प्री–इनक्युबेशन प्रोग्राम’च्या माध्यमातून या संकल्पनेला पुढे नेत हा कार्यक्रम अगदी सुरुवातीच्या कल्पनेपासून ते सक्षम स्टार्टअप विकसित करण्यापर्यंत मदत करतो. यामध्ये नाविन्यपूर्णता, समस्या निवारण आणि उद्योजकीय विचारसरणीवर भर दिला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सधने आणि इकोसिस्टम सपोर्ट मिळतो.

या कार्यक्रमातून वैचारिक स्तरावर संरचित उद्योजकता प्रशिक्षण देण्यात येते. तज्ज्ञ मार्गदर्शक आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांसह सखोल स्टार्टअप बूटकॅम्प, इतर नाविन्यपूर्ण विचारवंत आणि संस्थापकांसोबत सहयोग आणि नेटवर्किंगच्या संधी मिळते. स्पर्धा पूर्ण केल्यावर सहभागाचे ई–प्रमाणपत्र मिळते. आश्र्वासक कल्पनांसाठी ‘सीड ग्रांट’ स्वरूपात निधी मिळवण्याची संधीही मिळत असून, मुंबई येथील आय स्पार्क इनक्युबिशेन फाउंडेशन मध्ये इनक्युबेशनसाठी पात्र होण्याची संधी मिळणार आहे.

# आशा कार्यकर्त्या समाजाच्या आरोग्य सैनिक ग्रामीण जनतेचे त्यांच्यामुळेच आरोग्य सुरक्षित

लातूर दि.३० :– मनात कार्याचे धन असल्याने मानधनाकडे दुर्लक्ष करून कसलीही अशा आणि अपेक्षा न ठेवता अशा कार्यकर्तीचे कार्य कौतुकास्पद असून ज्या पद्धतीने सीमेवर सैनिक लढतात त्याप्रमाणे सामाजिक दुवा म्हणून आशा स्वयंसेविका खऱ्या अर्थाने आरोग्य सैनिक आहेत. त्यांच्या कार्यामुळेच ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य सुरक्षित राहते असे प्रतिपादन भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशअप्पा कराड यांनी केले.



रेणापूर तालुका आरोग्य विभागाच्या वतीने आशा दिनानिमित्त २९ मार्च २०२६ रविवार रोजी रेणापूर येथील पंचायत समितीच्या सभागृहात सौ. संजीवनीताई कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत आशा स्वयंसेविकांचा गौरव सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमास रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका रविंद्र सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई आकनगिरे, जिल्हा परिषद सदस्य सौ. शिवकन्याताई गोडभरले, सौ. आशाताई भिसे, पंस सदस्य तात्याराव वाघमारे रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. अनिता अलगुले आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, आयुष्यमान कार्ड यासह आरोग्य क्षेत्राशी निगडित व इतर बाबी मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन कामाचा गौरव करण्यात आला. आशा दिनानिमित्ताने सामाजिक जनजागृती विषयी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमात अनेक आशा स्वयंसेविकांनी आपल्या कार्याची माहिती मनोगतातून दिली. प्रारंभी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद करून आशा स्वयंसेविकांच्या कार्याचे कौतुक केले.

कोरोना काळात कोणी कोणाला भेटत नव्हते अत्यंत भयावह परिस्थिती असतानाही आशा स्वयंसेविकांनी घरोघरी जाऊन केलेले कार्य कदापी विसरता येणारे नाही असे सांगून यावेळी बोलताना सौ. संजीवनीताई कराड म्हणाल्या की, ग्रामीण भागातील गर्भवती महिलाची काळजी घ्यावी, त्यांना तपासणीसाठी प्रोत्साहित करावे, लसीकरणासाठी मदत, लहान मुलांच्या आरोग्याची देखरेख आणि शासकीय आरोग्याच्या योजना अशा स्वयंसेविकांनी लोकापर्यंत पोहोचण्याचे काम करावे असे आवाहन करून जनतेचे आरोग्य सुधारण्यात आशा स्वयंसेविकाचा मोठा वाटा असल्याचे गौरवद्गार काढले. या कार्यक्रमास तालुक्यातील आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## दयानंद विज्ञानमध्ये विद्यार्थी व पालक सुसवाद मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : येथील गुणवत्तेची उज्वल परंपरा असलेल्या दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दि.२८ मार्च २०२६ रोजी संस्थेच्या दयानंद सभागृहात नीट, जेईई,एमएचटी – सीईटी तयारी करू इच्छिणारे विद्यार्थी व पालक सुसंवाद मेळाव्याचे आयोजन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या संकल्पनेतून करण्यात आलेले होते.या मेळाव्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,एमएचटी–सीईटी विभाग समन्वयक प्रा.कविता जाधव,जेईई विभाग समन्वयक प्रा.रवीकुमार, नीट विभाग समन्वयक डॉ.कोमल गोमारे,प्रा.बळवंत सूर्यवंशी,परीक्षा विभाग समन्वयक प्रा.विजयकुमार मांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्था ही गुणवत्तेची उज्वल परंपरा कायम राखणारी व विद्यार्थ्यांचे करिअर घडवणारी अग्रगण्य संस्था आहे. संस्था संलग्नित दयानंद विज्ञान महाविद्यालयाने जेईई,नीट आणि एमएचटी–सीईटी व १२ वी बोर्ड आणि उच्च शिक्षणातला लातूर शैक्षणिक पॅटर्न निर्माण केलेला आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक,विद्यार्थी समस्या निर्मूलन केंद्र,नाईट रिडींगची व्यवस्था, मोफत चहाची सोय,सुसज्ज ग्रंथालय, मुलांमुलींसाठी वसतीगृह,स्मार्टबोर्डयुक्त डिजिटल वर्गखोल्या,विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या सराव परीक्षा व इतर उपक्रम महाविद्यालयात सातत्याने राबविले जातात.म्हणूनच दयानंद विज्ञानचे विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर व देशाचा आदर्श नागरिक म्हणून विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.दयानंद शिक्षण संस्था ही कुटुंबसंस्था आहे.जसे आई– वडील घरांमध्ये मुलांची काळजी घेतात, त्याप्रमाणेच दयानंद शिक्षण संस्थेत काळजी घेतली जाते. दयानंदमध्ये एकल पालक योजना, दत्तक योजना असे विविध

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894